# विद्यापीठ गीत

विद्येची अन् पवित्रतेची इथे वाहते ज्ञानधारा
मानवतेचा मंगलमय हा इथे खेळतो विश्ववारा ॥धृ.॥

तेजोमय उजळितो प्रकाश
श्रमाचे, कष्टाचे आकाश
संपविते सौदामिनी, युगांचा अंधार सारा
विद्येची अन् पवित्रतेची इथे वाहते ज्ञानधारा ॥१॥

चंदनाची व्रतस्थ भूमि
प्रज्ञा, प्रतिभा गगनगामी
समतेचा ममतेचा हा साधनेचा अढळ तारा
विद्येची अन् पवित्रतेची इथे वाहते ज्ञानधारा ॥२॥

बुद्धकरूणेचा विहार इथे
शिवरायाचा आचार इथे
निरंतर न्यायासाठी स्वातंत्र्याचा इथे पहारा
विद्येची अन् पवित्रतेची इथे वाहते ज्ञानधारा ॥३॥

विचार-विवेक विज्ञानाचे
ज्ञानतीर्थ हे महात्मतेचे
मातीच्या मोहराचा गोदावरीचा इथे किनारा
विद्येची अन् पवित्रतेची इथे वाहते ज्ञानधारा ॥४॥
मातीच्या मोहराचा गोदावरीचा इथे किनारा
विद्येची अन् पवित्रतेची इथे वाहते ज्ञानधारा ॥४॥

– फ. मुं. शिंदे